देशदूत
जळगाव आवृत्ती
रविवार, दि.५ सप्टेंबर २०१०

# एम्को फाऊंडेशनतर्फे गुणवंतांचा सत्कार

**जळगाव, दि.४ (प्रतिनिधी)** - एम्को लिमिटेड कंपनीचा सामाजिक कार्यविभाग, एम्को फाउंडेशनतर्फे दहावीच्या यशस्वी गुणवंतांचा पारितोषिक व शिष्यवृत्ती वितरणाचा कार्यक्रम कंपनीच्या आवारात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास सभापती विजय वाणी, प्रा. जीवन खिवसरा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी विजय वाणी यांनी एम्को फाउंडेशनच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले व एम्कोच्या या माध्यमातून संस्कारक्षम पिढी निर्माण होत आहे याचा आनंद होतो असे सांगितले. श्री. खिवसरा यांनीही मार्गदर्शनात वेळेच महत्व विषद केले. एम्कोचे प्लँट हेड श्री सत्यनारायणा तसेच नितीन भावसार यांनीही मागंदर्शन केले. मॅनेजिंग ट्रस्ट रामास्वामी यांनी विविध उपक्रमाबाबत माहिती दिली. या उपक्रमांतर्गत मनपाच्या शाळा, महाराणा प्रताप शाळेतील यशस्वी अशा ४६ विद्यार्थ्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. या विद्यार्थ्यांना पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे असे त्यांनी सांगितले.




एम्कोतर्फेतर्फे आयोजित गुणवंतांच्या गौरवप्रसंगी सभापती विजय वाणी, प्रा. जीवन खिवसरा, श्री. सत्यनारायणा, रामास्वामी, नितीन भावसार आदी.